नि.दि.दा.क्र. १५/२०२१
**निशाणी क्र.३६ पासून पूढे**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१– सजन लोहारे यांचा पूढील सरतपास वकील श्री. आर आर कुलकर्णी यांच्यामार्फत शपथेवर सूरू:</u>**

माझ्या शपथपत्रातील मजकूर माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे. आज मी पूराव्याच्या शपथपत्राबरोबर मूळ कागदपत्रे दाखल केली आहेत. त्यामध्ये दि. २५.०५.२०१० रोजीच्या पंचनाम्याची प्रमाणीत प्रत, तसेच ताबा पावतीची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे त्यास **निशाणी क्र. ५३ आणि ५४** अनुक्रमे देण्यात येत आहे. अप्पर विभागीय आयुक्त, यांची दि. १४.०९.२०२१ रोजीच्या न्यायनिर्णयाच्या प्रमाणित प्रत ला **नि. क्र. ५५** देण्यात येत आहे. जमीनी संपादन केल्याचा अहवाल **नि. क्र. ५६** तसेच अवॉर्ड स्टेटमेंट ला **नि. क्र. ५७** देण्यात येत आहे. अप्पर जिल्हाधिकारी, जालना यांच्या दि. ०७.०८.२०२० रोजीच्या निकालाची प्रमाणीत प्रतीला **नि. क्र. ५८** देण्यात येत आहे. भुमिअभिलख कार्यालय, यांनी जारी केलेले गट एकत्रिकरण उतारा यास **नि. क्र. ५९** देण्यात येत आहे. वाभाडी ता. पैठण येथील भुमिअभिलेख कार्यालयाने दिलेले स्टेटमेंटला **नि. क्र. ६०** देण्यात येत आहे. वडवडी ता. पैठण येथील सर्व्हे क्र. ५१ चे भुमिअभिलेख कार्यालयाने दिलेले स्टेटमेंटला **नि. क्र. ६१** देण्यात येत आहे. दि. दा. क्र. १५८/२००३ च्या दावा व हुकूमनाच्या नक्कलेस **नि. क्र. ६२** देण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या नारळा ता. पैठण येथील भुमी संपादन केल्याबद्दचे परिशिष्ठ/आदेश यास **नि. क्र. ६३** देण्यात येत आहे. तहसिलदार यांनी जिल्हा पुर्नवसन अधिकारी, जालना यांना दिलेले पत्रास **नि. क्र. ६४** देण्यात येत आहे. मौजे पाथरवाला येथील गट क्र. १८२ च्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत ला **नि. क्र. ६५** देण्यात येत आहे. उप जिल्हाधिकारी पुर्नवसन यांचा दि. १७.०३.२०२१ रोजीच्या आदेशाची प्रमाणीत प्रत यास **नि. क्र. ६६** देण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाचा दि. ११.०६.२००४ रोजीचा शासन निर्णय यास **नि. क्र. ६७** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>प्रतिवादीतर्फे वकील श्री. व्ही. व्ही. उढाण यांच्या विनंतीवरून ऊलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरित/–
(एस. एस. जैन)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंबड

दिनांक:०८/०४/२०२६

**<u>प्रतिवादीतर्फे वकील श्री. एस. एम. पाटील यांच्यामार्फत ऊलट तपास शपथेवर सूरू.</u>**

२. राजेंद्र लक्ष्मण लोहारे माझे मोठे भाउ आहेत. सजेंद्र लोहारे माझेच नाव आहेत. वादग्रस्त जमीन माझ्या वडीलांना धरणग्रस्त पूनर्वसन प्रस्थापीत म्हणून मिळाली आहे. वादग्रस्त जमीन शासनाने संपादीत केली होती. त्यासंबंधीचे कागदपत्रे माझ्याकडे आहेत (वादीच्या विद्यमान वकीलांनी नमूद केले की, नि.क्र.५६ कडे दस्तऐवज दाखल आहेत)

३. मला लिहिता वाचता येते. आता मला नि.क्र.५६ कडील अहवाल दाखविण्यात आला. सदर कागदपत्रे पाथरवाला येथील जमीन संपादन असल्याबद्दल दाखल केले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, नि.क्र.५६ मध्ये संपादन केलेल्या जमीनीव्यतिरिक्त त्या गटात जास्तीची जमीन नमूद आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, गटक्रमांक १८२ मध्ये एकूण १३ हेक्टर ५५ आर जमीन आहे. १३ हेक्टर ५५ आर पैकी नेमकी कोणती जमीन संपादीत केली आहे याबद्दल नि.क्र.५६ मध्ये नमूद नाही. शासनाने नेमकी कोणती जमीन संपादीत केली आहे त्याचे कागदपत्रे माझ्याकडे आहेत. साक्षीदार म्हणतो की, १९९७ सालाचा पूनर्वसन अधिका–याचा आदेश माझ्याकडे आहे. साक्षीदार म्हणतो की, सदर आदेश नि.क्र.६३ कडे आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, नि.क्र.६३ कडील आदेशात संपादीत केलेल्या जमीनीच्या चतूसिमा नमूद नाहीत. चतूसिमा दर्शवणारा कागदपत्र मी दाखल केलेला नाही. त्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे सर्वे क्र.९४ च्या चतूसिमा मी तहसील कार्यालय अंबड येथून उपलब्ध करून घेतल्या आहेत.

४. मला आता नि.क्र.५३ कडील पंचनामा दाखविण्यात आला. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यात सर्व क्र.९४ च्या चतूसिमा नमूद आहेत. साक्षीदार म्हणतो की, नि.क्र.५३ कडील पंचनाम्यात ज्या चतूसिमा नमूद आहेत त्याच वादग्रस्त मिळकतीच्या चतूसिमा आहेत. आता मला नि.क्र.५४ कडील ताबा पावती दाखविण्यात आली. हे म्हणणे बरोबर आहे की, सदर ताबा पावतीत २ हेक्टर ८३ आर जमीनीच्या चतूसिमा नमूद नाहीत. नि.क्र.५३ कडील पंचनाम्यात पूर्वेला– सर्वे क्र.१०८ असल्याचे बरोबर आहे. दक्षिणेला – सर्वे क्र.१०७ असल्याचे बरोबर आहे. या सर्वे क्रमांकांचे गटक्रमांक काय झाले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, सदर पंचनामा २५.०५.२०१० रोजीचा आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, २०१० साली सर्वे क्रमांक अस्तित्वात नव्हते त्यावेळी गटक्रमांक देण्यात आले होते.

५. हे म्हणणे बरोबर आहे की, दाव्यामध्ये वादग्रस्त मिळकतीच्या ज्या चतूसिमा नमूद केल्या आहेत त्या मी स्वत:च्या माहिती आधारे लिहिल्या आहेत. त्यासंबंधीचे कागदपत्रे नाहीत, जे माझ्या शेजारी आहेत ते लिहिले आहे. माझ्या वडीलांना शेतजमीन शासनाने १९९७ साली दिली होती. त्यावेळी माझ्या वडीलांच्या नावे फेरफार किंवा ताबा पंचनामा, ताबा पावती झालेले नवहते. साक्षीदार म्हणतो की, मूळ मालक जिल्हा न्यायालय, जालना येथे केस दाखल केल्यामूळे तसे कागदपत्रे झाले नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे

की, २०१० च्या जालना येथील केसमध्ये माझे मोठे बंधू राजेंद्र पक्षकार होते. या दाव्याबद्दल मला माहिती आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या दाव्यामध्ये प्रतिवादी धनंजय हेच ताबेदार आहेत असा निकाल लागला होता. (सदर निकाल प्रतिवादीतर्फे दाखल आहे). त्या दाव्यासंबंधी माझे बंधू– राजेंद्र न्यायालयात येवून साक्ष देवू शकतात. हे म्हणणे बरोबर आहे की, वादग्रस्त मिळकतीबद्दल फेरफार क्र.१२५९ नोंद झाला होता. साक्षीदार स्वत: म्हणतो की, त्यामध्ये इतर हक्कात माझ्या वडीलांचे नाव आहे. तो फेर मी पाहिलेला आहे. आता मला फेरफार क्र.१२५९ दाखविण्यात आला हा तोच आहे. त्यामध्ये माझ्या वडीलांचे नाव नाही परंतू, धरणग्रस्त अशी नोंद दिसत आहे. सदर फेरफार क्र.१२५९ ला **नि.क्र.६९** देण्यात येत आहे. सदर पंचनाम्यात नमूद केल्याप्रमाणे "फेरफार क्र.४६४ नूसार व तलाठी यांच्या पंचनाम्यानूसार ताब्यात असून धरणग्रस्त यांच्या ताब्यात कोणतीच जमीन नाही” हा मजकूर बरोबर आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, फेरफार क्र.१२५९ अन्वये प्रतिवादींच्या नावे मालकीहक्काची नोंद सातबारा उता–यात झालेली आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
(एस. एस. जैन)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंबड

दिनांक:१६/०४/२०२६